ARTHA
Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २ मे, १९५६ | अंक १८

## विविध माहिती

**इटारसी येथें कागदाचा कारखाना**—मध्यप्रदेशांतील होशंगाबाद जिल्ह्यांत इटारसी येथें कागद तयार करण्याचा नवीन कारखाना काढण्यांत येणार असल्याचें समजतें. कारखान्याच्या उभारणीसाठी दोन कोटी रुपये भांडवल लागेल आणि त्यांत दररोज सुमारें दोन टन वजनाचा कागद तयार होऊं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**सरकारनें मिळविलेला फायदा**—मध्यवर्ती सरकारनें आयात केलेली साखर विकून ८ कोटी रुपये नफा मिळविला अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. गेल्या दोन वर्षांत सरकारनें एकूण १०·५७ लाख टन परदेशी साखर आयात केली. त्यापैकीं ९·८५ लाख टन साखर आतांपर्यंत विकण्यांत आली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत भारतांत साखरेचे ३५ नवे कारखाने काढण्यांत येणार आहेत.

**भूमिहीनांची पुनर्वसाहत**—भोपाळपासून ७० मैलांवर असलेल्या सुलतानपूर ह्या ठिकाणीं सरकारी मालकीचें एक यांत्रिक शेत सुरू करण्यांत येणार आहे. यंत्रांच्या साह्यानें १०,००० एकर जमिनींत लागवड करण्यांत येईल. ह्या शेतावर त्रावणकोर–कोचीन राज्यांतील आणि भोपाळ राज्यांतील ४०० भूमिहीन शेतमजुरांच्या कुटुंबांची पुनर्वसाहत करण्यांत येणार आहे. येत्या जूनपासून वसाहत स्थापन करण्यांत येईल.

**ब्रिटिश तज्ज्ञाची मदत**—भारतामधील मोटारींच्या धंद्याची चौकशी करून त्याचा विस्तार करण्यासाठीं शिफारसी सुचविण्याला मि. रोमर ह्या ब्रिटिश तंत्रज्ञाला भारतीय सरकारनें पाचारण केलें होतें. मि. रोमर ह्यांनीं आवाहनाचा स्वीकार केला आहे. ब्रिटनमधील असोसिएटेड कमर्शिअल व्हिइकल्स ह्या संघटनेचे ते संचालक आहेत.

**तेलगू भाषेंत ज्ञानकोश**—तेलगू भाषेंत ज्ञानकोश तयार करण्याचें कार्य आंध्र विज्ञानकोषसमिति ह्या संस्थेनें अंगावर घेतलें आहे. समितीतर्फे दरवर्षी एक खंड प्रकाशित करण्यांत येणार आहे. पहिला खंड ऑक्टोबरमध्यें गांधीजयंतीच्या दिवशीं प्रसिद्ध करण्यांत येईल. ज्ञानकोशाचे सर्व खंड प्रसिद्ध करण्यासाठीं १,२५,००० रुपये लागतील.

**रशिअन तज्ज्ञांचा अहवाल**—भारतांत खनिज तेल कोठें सांपडूं शकेल ह्यासंबंधीं तपासणी करण्यासाठी तीन सोव्हिएट तज्ज्ञ भारतांत आले होते. त्यांनीं पांच महिनेपर्यंत देशाच्या निरनिराळ्या भागांत दौरा करून आपला अहवाल भारतीय सरकारला सादर केला आहे. विशेष म्हणजे दक्षिण भारतामधील ह्यासंबंधींची माहितीहि त्यांनीं जमा केली आहे.

**मद्रासच्या कापडाला मागणी**—मद्रासकडील हातमागाचे लुंगीचे ५ लाख वार कापड चालू वर्षी अमेरिका विकत घेणार आहे. खेळांसाठी लागणारे शर्टस्, कोट, चड्डया आणि बायकांचे कपडे ह्यासाठी हें कापड अमेरिकेंत फार लोकप्रिय झालें आहे. खेळांचे पोषाख व सामान पुरविणाऱ्या एका अमेरिकन कंपनीनें १,५०,००० वारांची मागणी नोंदविली आहे.

**भारतीय रेल्वेजचीं वर्कशॉप्स**—भारतीय रेल्वेबोर्ड दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत कांहीं नवीन वर्कशॉप्स उघडणार असून जुन्यांचा विस्तारहि करणार आहे. ह्या कामासाठीं ४६ कोटी रुपये खर्च येईल. रेल्वेएंजिनांचे सुटे भाग तयार करण्यासाठीं दोन नवे कारखाने मुद्दाम उभारण्यांत येणार आहेत. त्याशिवाय रेल्वेला लागणारा कांहीं अत्यंत महत्त्वाचा माल तयार करण्याचीहि सोय करण्यांत येईल.

**चार्ली चॅपलीनचा गौरव**—रशिअन कम्युनिस्ट पक्षाचे सर चिटणीस श्री. क्रुश्चेव्ह लंडनमधील एका समारंभाला हजर असतां सुप्रसिद्ध सिनेमानट व निर्माते चॅर्ली चॅपलीन ह्यांचा त्यांनीं गौरव केला. शरीररक्षकांनीं इतर निमंत्रितांना मुद्दाम बाजूला केलें आणि ह्या उभयतांचीं छायाचित्रें घेण्यास फोटोग्राफर्सना संधि दिली. चॅर्ली चॅपलीन ह्यांचे चित्रपट रशिआंत फार आवडतात, असें श्री. क्रुश्चेव्ह ह्यांनीं सांगितलें.

**कर्जत येथें नवा गौळवाडा**—कर्जत येथील समाज–विकास–योजनेचा एक भाग म्हणून तेथें गौळवाडा स्थापन होण्याची शक्यता आहे. गौळवाड्यांतून मुंबईला रोज १०,००० पौंड दुधाचा पुरवठा करतां येईल. गौळवाड्याच्या योजनेला ५ लाख रुपये खर्च येईल. कर्जत, नेरळ, खोपोली, चौक, इत्यादि गांवांतून दूध गोळा करून तें कर्जत येथें बाटल्यांतून भरण्यांत येईल.

**सौराष्ट्रांतील बुद्धजयंति**—गौतम बुद्धाची २५००वी जयंति साजरी करण्याबाबत सौराष्ट्रांत बराच उत्साह दिसून येत आहे. भारतीय सरकारप्रमाणेंच सौराष्ट्र सरकारहि कांहीं अधिकृत कार्यक्रम आंखीत आहे. इतिहासकारांच्या मतानें बुद्ध सौराष्ट्रांत येऊन गेला होता. भावनगरजवळ व गिरनारच्या पर्वतांत कांहीं बुद्ध लेणींहि आहेत.

**सीलोनमधील चहाचें उत्पादन**—चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींत सीलोनमधील चहाच्या उत्पादनांत बरीच घट झाली आहे. १९५५ च्या मार्चअखेर १०·२ कोटी पौंड चहाचें उत्पादन झालें होतें. १९५६ च्या मार्चअखेर ३·४४ कोटी पौंडच उत्पादन झालें. कांहीं भागांत अवर्षण झाल्यानें आणि कांहीं भागांत थंडी पडल्यामुळें उत्पादनावर बराच प्रतिकूल परिणाम झाला.

## अखिल भारतीय सहकारी साखरकारखाना संमेलन

### प्रवरानगर सहकारी साखरकारखाना येथील मेळावा

( आमचे प्रासंगिक बातमीदाराकडून )

नगर जिल्ह्यांतील लोणी येथील प्रवरा सहकारी कारखान्याचे चालकांनीं निमंत्रण केल्यावरून अखिल भारतीय सहकारी साखरकारखान्यांच्या चालकांचा मेळावा लोणी येथें दिनांक १४, १५, १६ एप्रिल रोजीं सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. धनंजयराव गाडगीळ यांचे अध्यक्षतेखालीं भरला होता.

भारत सरकारनें परदेशी साखर आयात कमी करण्याचें ठरवून देशांतील साखरकारखाने उभारण्याचे बाबत आपलें अनुकूल धोरण ठरविलें व त्याबरोबरच नवीन स्थापन होणारे कारखाने हे सहकारी तत्त्वावर स्थापले जावेत असें ठरविलें व भारतामधील सहकारी तत्त्वावरील पहिला लोणी येथील सहकारी कारखाना यशस्वी झाल्यानें सहकारी कार्यकर्त्यांना उत्साह वाटला व सरकारलाहि विश्वास वाटला व यामुळें आतां नवीन होणारे ३५ साखरकारखाने सहकारी तत्त्वावर व्हावेत असें धोरण ठरलें. अर्थात्, सहकारी तत्त्वावर असे कारखाने उभारले जाऊन ते योग्य प्रकारें चालणें सोपें नाहीं आणि या दृष्टीनें या कारखान्यांनीं एकंदर कामाची आंखणी, त्यामधील संभाव्य अडचणी, व यशस्वी करण्यासाठीं पाळावयाची शिस्त यासंबंधीं एकत्रित येऊन विचार करणें हें अगत्याचें व जरूरीचें होतें. मध्यवर्ती सरकारच्या अन्नखात्याचे साखरविभागाचे प्रमुख यांनीं यांत भाग घेऊन हें संमेलन घडवून आणण्याचे कामीं पुढाकार घेतला व त्यामुळें मध्यवर्ती सरकारचे प्रतिनिधी, इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशनचे प्रतिनिधी, रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी व प्रांतिक सरकारचे प्रतिनिधी हजर होते. याशिवाय सहकारी साखरकारखान्यांचेहि प्रतिनिधी हजर होते. कानपूर येथील साखरसंशोधनखात्याचेहि प्रतिनिधी हजर होते. प्रा. ध. रा. गाडगीळ यांना दोन प्रकाराचें काम करावें लागलें : एक, लोणी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष म्हणून यजमान म्हणून स्वागत करण्याचे व सभेचे अध्यक्ष म्हणून मुख्य पाहुण्यांचे कामहि त्यांना करावें लागलें. त्यांनीं आपले भाषणांत शेतीमालाचें पक्क्या मालांत रूपांतर करण्याचें महत्त्व व शेतकऱ्यास या नवीन अर्थविषयक घडींत कोणतें स्थान आहे हें समजाऊन सांगितलें. यापुढें भांडवलदार यांनीं नवीन समाजरचना लक्षांत घेऊन समाजकल्याणासाठीं पुढाकार घेणें जरूर असल्याचें सांगितलें. सहकारी साखरकारखाने यशस्वी होण्यास आवश्यक गोष्टी म्हणजे लहान लहान शेतकऱ्यांना एकत्रित आणून त्यांना योग्य तें मार्गदर्शन व साहाय्य करून त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारणें व संचालकमंडळाबरोबर वारंवार चर्चा करून त्यांचा दृष्टिकोन बदलण्याची खटपट करणें हा होय. लोणी येथील साखरकारखान्याचे उभारणीबाबत संचालकमंडळानें आपले स्वतःचे व्यवहाराकडे दुर्लक्ष करून कारखान्याची उभारणी केली याचा त्यांनीं गौरवपूर्ण उल्लेख केला. सहकारी साखरकारखान्यांनीं सरकारकडे आर्थिक अगर इतर मदत मागतांना एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यांनीं सांगितलें कीं या साखरकारखान्यांना पुढें नफ्याचे वेळीं सरकारनें त्याग करावयास सांगितल्यास तो त्यांना करणें अगत्याचें व जरूरीचें आहे.

या संमेलनांत एकूण १३ विषयांवर चर्चा झाली. ठराव वगैरे झाले नाहींत परंतु चर्चेचा सारांश नोंदवून ठेवण्यांत आला. चर्चेत खालील विषय होते. ( १ ) साखरकारखान्यांचे लायसेन्स शक्य तितके सहकारी साखर कारखान्यांना द्यावेत ( २ ) साखर कारखान्यांना लागणारें भांडवल जमविण्याबद्दल सहकारी संस्था ( ३ ) प्रांतिक सरकार व रिझर्व्ह बँक यांना विनंति ( ३ ) इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनकडून मिळणारे कर्जाबद्दल ( ४ ) खेळतें भांडवल उभारण्याबद्दल ( ५ ) कारखाना उभारण्यासाठीं लागणारें आवश्यक सामान ( ६ ) कारखान्याच्या व्यवस्थेसाठीं लागणारा नोकरवर्ग ( ७ ) संचालकमंडळाची घटना ( ८ ) सभासदांची निष्ठा ( ९ ) कारखाना व मजूर यांचे संबंध ( १० ) तांत्रिक प्रश्न वगैरेसंबंधीं शिफारशी, इत्यादि.

या संमेलनाचें वैशिष्ट्य म्हणजे प्रवरानगर सहकारी साखरकारखान्यानें सर्व व्यवस्था अगत्यपूर्वक व टापटिपीची ठेवली. कोणत्याहि व्यवस्थेंत न्यून ठेवलें नाहीं आणि त्याचें श्रेय कॅप्टन मोहिते व त्यांचे सहकारी यांना आहे. कॅ. मोहिते हे स्वतः उत्तम शेतकरी आहेत. त्यांनीं आपली शेती फारच अद्यावत् अशी केली आहे. संमेलनामध्यें झालेल्या चर्चेमध्यें प्रामुख्यानें सरकारचे प्रतिनिधींनींच भाग घेतला. सहकारी कार्यकर्त्यांनीं फारसा भाग किंबहुना मुळींच घेतला नाहीं याचें एक कारण असूं शकेल व तें म्हणजे महाराष्ट्रांतील सहकारी साखरकारखान्यांचें नेतृत्व प्रा. ध. रा. गाडगीळ यांचेकडेच आहे. तेव्हां सर्व अडचणींची त्यांना योग्य कल्पना आहे त्यामुळें त्यांचें मार्गदर्शन असल्यानें इतरांनीं बोलण्याचें कारण नाहीं. दुसरें कारण असेंहि असण्याचा संभव आहे कीं, झालेली चर्चा सर्व इंग्रजींत झाली; त्यामुळें शेतकऱ्यांस त्यामध्यें भाग घेणें अडचणींचें झालें असेल. संमेलन बहुतेक दरवर्षी भरेल असें वाटतें व त्यावेळीं कदाचित् आणखी जादा कारखाने उत्पादनास सुरवात करतील व त्यामुळें पुढील संमेलनाचे वेळीं चर्चेमध्यें जास्त प्रतिनिधी भाग घेतील असें वाटतें.

**भातशेतीची जपानी पद्धत**—आंध्र राज्यांत जपानी पद्धतीनें भाताची लागवड करण्याची पद्धत शेतकऱ्यांना फार पसंत पडली आहे. त्यामुळें चालू वर्षी ह्या पद्धतीनें भाताची लागवड करण्याचें क्षेत्र प्रत्येक जिल्ह्यांत पूर्वीपेक्षा दुप्पट करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ही पद्धत सुरू करतांना शेतकऱ्यांकडून इतकें मोठें सहकार्य मिळेल, अशी सरकारची कल्पना नव्हती.

**रेल्वेच्या रुळाखालील स्लीपर्स**—रेल्वेच्या रुळाखाली सध्यां लांकडी अगर लोखंडी स्लीपर्स वापरण्यांत येतात. त्यांच्याऐवजीं सिमेंट कॉंक्रीटचे स्लीपर्स वापरण्याचा प्रयोग करण्यांत येणार आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. अशा प्रकारचा प्रयोग बेल्जम, फ्रान्स, जर्मनी, जपान व ब्रिटन ह्याहि देशांतून करण्यांत येत आहे, असेंहि सांगण्यांत आलें.

तमाम दंतरोगांवर
☆ माकडछाप म्हणजेच काळी दूध पावडर ☆

# अर्थ

बुधवार, ता. ९ मे, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पंचवार्षिक कार्यक्रमांतील विसंगती

मुंबई येथील स्कूल ऑफ इकॉनामिक्स अँड सोशिऑलजी ह्या संस्थेचे डायरेक्टर प्रा. सी. एन्. वकील ह्यांनीं 'दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील कांहीं विसंगति-स्थलें' ह्या विषयावर रोटरी क्लबमध्यें व्याख्यान दिलें. ते म्हणाले कीं, अविकसित देशांत कांहीं विशिष्ट आर्थिक परिस्थिति असते. ती विचारांत घेऊन नियोजित अर्थव्यवस्था उभारतांना नव्या दृष्टिकोनांतून पाहिलें पाहिजे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं हा दृष्टिकोन कोणता आहे? कार्यक्रमाचा आराखडा ठरवितांना रोजगार आणि भांडवलाचा संचय ह्या गोष्टींकडे लक्ष देण्यांत आलें पाहिजे. पण त्याचबरोबर तांत्रिक प्रगति आणि छोट्या उद्योगधंद्यांचें स्थान ह्या बाबींचाहि विचार झाला पाहिजे. यंत्रप्रधान उद्योगधंद्यांच्या उत्पादनावर नियंत्रण घालणें, म्हणजे ज्या मालाला मागणी येणार आहे अशा मालाच्या पुरवठ्यांत कपात करण्यासारखेंच आहे. दुसरें असें कीं, रहाणीचें मान वाढवावयाचें म्हटलें तर दैनंदिन गरजा भागविणाऱ्या वस्तू अधिकाधिक प्रमाणांत उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यांचें उत्पादन जर नियंत्रित केलें तर रहाणीचें मान वाढणार कसें?

अधिक संपत्तीचा उगम म्हटला म्हणजे श्रम हा आहे. ज्या श्रमशक्तीला आज काम नाहीं तिचा उपयोग करून अधिक संपत्ति आणि भांडवलाचा संचय हीं दोन्ही निर्माण करण्यांत आलीं पाहिजेत. पण आज ह्याच्या उलट कृति करण्यांत येत आहे. अस्तित्वांत असलेल्या उद्योगधंद्यांच्या प्रगतीला पायबंद घालण्यांत येत आहे. उत्पादन खालच्या पातळीवर नेण्यांत येत आहे, आणि इतकें करून बेकारी कमी होत नाहीं तीं नाहींच. नवीन रोजगारांची व नवीन उद्योगधंद्यांची वांटणी सर्व देशभर करण्यांत यावी. रस्ते बांधणें, पाटबंधारे तयार करणें, घरें बांधणें, इत्यादि कामांत अमर्याद रोजगारी मिळूं शकेल. पण रोजगारी उत्पन्न करण्याचा हा मार्ग अवघड आहे. म्हणूनच कीं काय, ग्रामोद्योगाच्या सोप्या मार्गाचा अवलंब करण्यांत येत आहे. रोजगारीचा प्रश्न ह्या मार्गानें सोडविण्याची पद्धत आपल्या अर्थव्यवस्थेंत कायमचीच ठाण मांडून बसण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. पण अर्थव्यवस्थेच्या प्रगतीवर त्यामुळें अनिष्ट परिणाम होतील. बचत ७ टक्क्यांवरून ११ टक्क्यांपर्यंत वाढेल आणि उत्पन्नहि २५ टक्क्यांनीं वाढून त्यांपैकीं बराच भाग भांडवल म्हणून गुंतवितां येईल, असें गृहीत धरण्यांत आलें आहे. पण बचतीचें ७ टक्के प्रमाण एकसारखें चालू रहाणेंसुद्धां कठीण जाईल. कारण, रोज खपाच्या वस्तूंची मागणी वाढत जाईल, रोजगार वाढेल आणि शक्य तितक्या अधिकाधिक वस्तूंचा उपभोग घेण्याची वृत्तीहि साहजिकच वृद्धीस लागेल. आपण सध्यांच अतिशय खालच्या आर्थिक पातळीवर रहात आहोंत. ह्या परिस्थितींत अधिक बचत करणें फार अवघड जातें. त्यामुळें साधनसंपत्तीचा जो अंदाज करण्यांत आलेला आहे, तो खरा ठरावयाचा झाल्यास लोकांवर सक्तीची बचत लादल्यासारखें होईल.

ह्यापुढें सार्वजनिक मालकीच्या आर्थिक विभागाचा विस्तार होत जाणार आहे. ह्या विभागाचें कामकाज करण्यासाठीं योग्य माणसांची गरज लागेल. अशा माणसांची भरती करून त्यांना जरूर तें शिक्षण देण्याच्या कामीं कांहीं प्रगति करण्यांत आलेली आहे. पण एका बाबतींत मात्र आपण होतो तेथेंच आहों. मोठे सार्वजनिक मालकीचे उद्योगधंदे चालविण्यासाठीं जो संचालक वर्ग लागतो, तो तयार करण्यासंबंधीं कांहीं हालचाल दिसत नाहीं. अशा प्रकारच्या जबाबदार अधिकाऱ्यांची दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत फार मोठ्या प्रमाणावर जरूर लागणार आहे. अशा माणसांची आपल्या देशांत आधींच टंचाई आहे. मग दुसऱ्या कार्यक्रमांत संचालकांची एकदम वाढणारी गरज आपण कशी भागविणार आहोंत, हा प्रश्नच आहे.

---

## हातमागाच्या कापडाला भरपूर बाजारपेठ

भारताचे डेप्युटी टेक्स्टाइल कमिशनर श्री. पी. सभानायकम् हे युरोपचा दोन महिन्यांचा दौरा करून मायदेशीं परत आले आहेत. ते जर्मनींतील लिपझिग येथील प्रदर्शनाला हजर राहिले होते. त्याचप्रमाणें, युरोपमधील इतर व्यापारी पेठांचेंहि त्यांनीं अवलोकन केलें आहे. भारतांत तयार होणाऱ्या हातमागाच्या कापडाला परदेशांतून कितपत वाव आहे ह्यासंबंधीं ते आपला अहवाल लवकरच मध्यवर्ती सरकारला सादर करणार आहेत. दरम्यान, वृत्तपत्रप्रतिनिधींना दिलेल्या मुलाखतींत ते म्हणतात कीं भारतीय हातमागाच्या कापडाला पूर्व युरोपांतील देशांत भरपूर वाव आहे. पश्चिम युरोपांतहि हें कापड कांहीं प्रमाणांत खपूं शकेल. पण तें जरूर त्या नमुन्याप्रमाणें पुरेशा प्रमाणांत उत्पादन केलें गेलें पाहिजे आणि वेळेवर पुरविलें गेलें पाहिजे. ब्रिटन, फ्रान्स, इटली, पश्चिम जर्मनी, ह्या देशांतील कापडाचा धंदा चांगलाच पुढारलेला आहे. तरीसुद्धां ब्रिटन व फ्रान्स हे देश चीनकडून बरेच रेशमी कापड आयात करीत असतात. चीनमधील रेशमी कापडाच्या किंमतीची तुलना केली तर ती भारताला अनुकूल अशीच ठरेल. सध्यांसुद्धां ब्रिटन भारताकडून कापसाचें कापडहि पुष्कळसे घेतें. त्यांपैकीं कांहीं कापडावर क्रिया करून तें आफ्रिकेला आणि दक्षिण अमेरिकेला पुन्हां निर्यात करण्यांत येतें. भारतीय कापडाला आफ्रिकेंत व दक्षिण अमेरिकेंत चांगली मागणी आहे. हातमागाच्या व्यवसायांतील निर्मात्यांनीं आपल्या मालाचे नमुने घेऊन लिपझिगसारख्या प्रदर्शनाला जाणें इष्ट ठरेल. अशा भेटीमुळें कोणत्या प्रकारच्या मालाला कोठें आणि कितपत वाव आहे, त्याची त्यांना नीट कल्पना येईल आणि त्यादृष्टीनें उत्पादनाला दिशा लावतां येणें शक्य होईल. अर्थात्, हातमागाच्या कापडाच्या बाजारपेठेचा विस्तार करणें अधिक सुलभ जाईल. भारतामधील हातमागाच्या व्यवसायाची संघटनाहि सुधारणें जरूर आहे.

---

# BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

*Balance Sheet as at 31st December, 1955.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** | | |
| 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—0—0 |
| **Issued Capital** | | |
| 10,000 shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—0—0 |
| **Subscribed Capital** | | |
| 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—0—0 |
| Amount called up and Paid up at Rs. 25/- per share ... | | 2,50,000—0—0 |
| **2. Reserve Fund and Other Reserves** | | |
| Reserve Fund ... | 45,407—2—0 | |
| Investment Reserve Fund ... | 24,130—6—0 | |
| Investment Fluctuation Fund ... | 3,534—8—0 | |
| Reserve for Bad and Doubtful Debts ... | 3,000—0—0 | 76,072—0—0 |
| **3. Deposits and Other Accounts :** | | |
| Fixed Deposits ... | 4,02,433—5—6 | |
| Savings Bank Deposits ... | 5,49,927—10—1 | |
| Current Accounts, Contingency accounts, etc. ... | 3,28,587—4—10 | 12,80,948—4—5 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| (i) In India ... | 66,807-12—9 | |
| (ii) Outside India ... | nil | 66,807-12—9 |
| **Particulars** | | |
| (i) Secured (against Government Securities shown as per contra.) ... | 66,807-12—9 | |
| (ii) Unsecured ... | nil | |
| **5. Bills Payable** | | nil |
| **6. Bills For Collection, being Bills Receivable as per contra** | | |
| (i) Payable in India ... | 6,882-13—6 | |
| (ii) Payable outside India ... | nil | 6,882-13—6 |
| **7. Other Liabilities** | | |
| (i) For Expenses ... | 3,617-10—3 | |
| (ii) Providend Fund partly invested as per contra ... | 11,940-10—8 | |
| (iii) Unpaid Dividends ... | 3,104-12—8 | |
| (iv) Branch Adjustments ... | 22,038-15—2 | 40,702—0—9 |
| **8. Acceptances, Endorsements and other obligations as per contra** | | nil |
| **9. Profit and Loss Account** | | |
| Profit as per last Balance Sheet. ... | 9,901—2—9 | |
| Less : appropriations :— | | |
| Reserve Fund Rs. 3,200—0—0 | | |
| Provision for Income-tax Rs. 3,500—0—0 | | |
| Provision for Bad and doubtful debts Rs. 3,000—0—0 | 9,700—0—0 | |
| | 201—2—9 | |
| Add:—Net profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss Account ... | 5,615—8-11 | 5,816—11—8 |
| **10. Contingent Liabilities** | | nil |
| Total Rs. ... | | 17,27,[illegible]-11—1 |

# BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

*Balance Sheet as at 31st December, 1955.*

## PROPERTY AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand and with the Reserve Bank and State Bank (Including Foreign Currency Notes) ... | | 1,57,319-11—2 |
| **2. Balances with other Banks** ( In current account ) | | |
| (i) In India ... | 23,529—8—5 | |
| (ii) Outside India ... | nil | 23,529—8—5 |
| **3. Money at Call and Short Notice** ... | | nil |
| **4. Investments at cost** ( Face value Rs. 8,66,800-0-0 ) | | |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments. | 8,69,510—6—0 | |
| (Of these Securities of the face value of Rs. 11,200/- are earmarked for Provident Fund as per contra. Market value Rs. 8,15,465-8-0. Some of these Securities of the face value of Rs. 6,50,000/- are lodged with Banking Companies for overdraft arrangement ). | | |
| (ii) Shares : ... | 645—0—0 | |
| Ordinary Shares fully paid of the face value of Rs. 600/- ( Market Price Rs. 615/- ) | | |
| (iii) Debentures or Bonds. ... | nil | |
| (iv) Other Investments. ... | nil | |
| (v) Gold ... | nil | 8,70,155—6—0 |
| **5. Advances** | | |
| (Other than bad and Doubtfull Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors ) | | |
| (i) Loans, Cash-credits, Over-drafts, etc. | | |
| (i) In India | 5,90,898-10—9 | |
| (ii) Outside India | nil | |
| | 5,90,898—10—9 | |
| (ii) Bills discounted and purchased. (excluding Treasury Bills of the Central and State Governments) | | |
| (i) Payable in India ... | 5,000—0—0 | |
| (ii) Payable outside India ... | nil | 5,95,898-10—9 |
| **Particulars of Advances** ( *See Page 142* ) | | |
| **6. Bills Receivable, being Bills For Collection As per contra** | | |
| (i) Payable in India ... | 6,882-13—6 | |
| (ii) Payable outside India ... | nil | 6,882-13—6 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations as per contra** | | nil |
| **8. Premises :** | | |
| Acquired and reconditioned during the year. ... | 26,399-15—9 | |
| Less-Depreciation. ... | 231—2—6 | 26,168-13—3 |
| **9. Furniture and Fixtures at Cost** | 23,359—9—3 | |
| Add-Additions. ... | 330—0—0 | |
| | 23,689—9—3 | |
| Less-Depreciation. ... | 13,535—6—0 | 10,154—3—3 |
| **10. Other Assets including silver** | | |
| (i) Interest accrued but not received. ... | 6,918-12—9 | |
| (ii) Printing & Stationery ( Stock as on 31-12-55 as certified by the Manager ) ... | 200—0—0 | |
| (iii) Interest due but not collected. ... | nil | |
| (iv) Income Tax deducted at source. ... | 21,607-11—0 | |
| (v) Sundry Debtors ( Rs. 925-6-9 being considered doubtful and not provided for ). ... | 8,394—1—0 | |
| (vi) Stamp Account. ... | nil | 37,120—8—9 |
| **11. Non-Banking Assets Acquired in satisfaction of Claims** ... | | nil |
| **12. Profit and Loss Account.** ... | | nil |
| Total ... | | 17,27,229-11—1 |

# BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1955 on page 141**

| | Particulars of advances :— | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| ( i ) | Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 3,89,745—5—7 |
| ( ii ) | Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 1,69,812-15-11 |
| ( iii ) | Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | nil |
| ( iv ) | Debts considered doubtful or bad not provided for ... | 36,340—5—3 |
| | | 5,95,898-10—9 |
| ( v ) | Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | nil |
| ( vi ) | Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 9,916—4—0 |
| ( vii ) | Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | nil |
| ( viii ) | Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 9,967—1—0 |
| ( ix ) | Due from Banking Companies ... | nil |

***Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1955***

| EXPENDITURE | | Rs. As.Ps. |
|---|---|---|
| 1. Interest paid on Deposits and Borrowings, ... | | 29,557—9—6 |
| 2. Salaries and Allowances and Provident Fund : | | |
| Manager and Chief Executive officers. | 4,193—1—0 | |
| Others | 18,596-12-8 | 22,789-13—8 |
| 3. Directors' & Local Committee members' fees & allowances ... | | 4,035—0—0 |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 3,608-13—0 |
| 5. Law Charges ... | | 225—0—0 |
| 6. Postage, Telegrams and Stamps | | 908—2—6 |
| 7. Auditor's Fees ... | | 350—0—0 |
| 8. Depreciation on and Repairs to the Banking Company's Property | | 1,314—6—6 |
| 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 845—7—6 |
| 10. Loss from Sale of or dealing with Non-Banking Assets ... | | nil |
| 11. Other expenditure : | | |
| Sundry Charges | 661-14-8 | |
| Travelling & Conveyance | 861—4-6 | |
| Telephone charges | 351-12-0 | 1,874-15—2 |
| 12. Balance of Profit (Subject to Taxation) carried to Balance Sheet ... | | 5,615—8-11 |
| Total Rs. ... | | 71,124-12—9 |

| INCOME | | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary Provisions) | | |
| 1. Interest and Discount ... | | 65,389—4—6 |
| 2. Commission, Exchange, Brokerage | | 1,543—4—6 |
| 3. Rents ... | | nil |
| 4. Net Profit on sale of Investments, Gold & Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserve or to any particular Fund or Account) ... | | 2,375—0—0 |
| 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold & Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserves or to any particular Fund or Account) ... | | nil |
| 6. Income from Non-Banking Assets and Profit from Sale of or dealing with such Assets ... | | 369—7—3 |
| 7. Other receipts : | | |
| Share Transfer fees and splitting fees | 31-4-0 | |
| Safe Custody charges | 262-0-0 | |
| Sundry other receipts and charges | 251-0-6 | |
| Supervision charges | 903-8-0 | 1,447-12—6 |
| Total ... | | 71,124-12—9 |

**Y. S. Joshi,** *Asstt. Manager.*

Poona,
**11th March, 1956.**

**M. V. Shingre,** *Chairman.*
**N. P. Thopte,** *Vice-Chairman.*
**Y. D. Khole,**
**B. G. Dhanduke,**
**C. R. Rathi,**
**G. B. Devi,** } *Directors.*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the annexed Balance Sheet of Bhor State Bank Ltd. Bhor, as at 31st December 1955, and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the certified returns of the Branches and report that :

(a) We have obtained all the information and explanations we have required; (b) In our opinion, the annexed Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law; (c) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank; and (d) In our opinion, books of account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act.

We have to report further that : (e) the information and explanations required by us have been found to be satisfactory; (f) The transactions of the Bank which have come to our notice, in our opinion, have been within the powers of the Bank; (g) the returns received from the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of this audit; (h) The Profit and Loss Account, in our opinion, shows a true balance of Profit for the period covered by such account.

POONA,
**11th March, 1956.**

**GADRE & BHIDE,**
*Chartered Accountants.*

## मोर स्टेट बँक लि.

(दिनांक ३१ मार्च १९५६ रोजीं बँकेच्या भागीदारांचे सर्वसाधारण सभेंत बँकेच्या संचालकमंडळाचे अध्यक्ष मा. म. व्यं. शिंगरे यांनीं केलेलें भाषण)

उपस्थित सभासद बंधूंनो, आपलें बँकेच्या संचालकमंडळाचे वतीनें बँकेचा सन १९५५ अखेरचा वार्षिक अहवाल व हिशेब-तपासनीस यांनीं तपासलेला ताळेबंद, नफातोटापत्रक व हिशेब-तपासनीस यांचा अहवाल आपले मंजुरीसाठी आपणांपुढें मी आनंदानें मांडीत आहे.

आपणाकडे आलेल्या ताळेबंदावरून आपणांस प्रामुख्यानें असें दिसून येईल कीं, गेल्या सात वर्षांत आपलेकडील असलेल्या ठेवींमध्यें उत्तरोत्तर वाढ होत आहे. चालू सालीं आपणांकडे असलेल्या सर्व ठेवींची रक्कम रु. १२,८०,००० चे सुमारास असून सन १९५४ सालची तीच रक्कम रु. १२,१०,००० होती. म्हणजे चालू सालीं ठेवींमध्यें सुमारें रु. ७०,००० वाढ झाली आहे. यावरून बँकेवर खातेदारांचा किती दृढविश्वास आहे हें दिसून येईल. रिझर्व्ह फंड व इतर फंड यामध्यें एकूण रक्कम रु. ७६,००० चे जवळ असून इतर बँकांकडून घेतलेल्या ओव्हरड्राफ्टची रक्कम रु. ६६००० चे जवळ आहे. आपल्या बँकेची १९४९ पासून सालोसाल प्रगति कशी झाली याची माहिती आपणांस खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| सन | एकूण ठेवी | दिलेलीं कर्जें | निव्वळ नफा |
|---|---|---|---|
| १९४९ | ९८३७८९ | ६६९७६४ | १३०२१ |
| १९५० | ९८७२३४ | ५७९५७२ | ७७७५ |
| १९५१ | ११६०७४६ | ६४६६०७ | ७४५५ |
| १९५२ | १११५५२६ | ६६९४१२ | ७१४४ |
| १९५३ | ११८९६०५ | ७६४३०६ | ६०३ |
| १९५४ | १२१०५७७ | ६०६८९२ | ९७९७ |
| १९५५ | १२८०९४८ | ५९०८९८ | ५६१५ |

वरील आंकड्यांवरून आपणांस असें दिसून येईल कीं, ठेवींचे आंकड्यांमध्यें वाढ झाली असून कर्ज व कॅशक्रेडिटचें प्रमाण मात्र बँकेनें वाढविलें नाहीं आणि त्यामुळें ठेवीवर दिलेले व्याजांत वाढ झाली व उत्पन्नांत घट झाली आणि त्यामुळें बँकेस होणारा नफा कमी झाला. तुलनात्मक दृष्टीनें विचार करतां सन १९५४ सालीं निरनिराळ्या ठेवींवर मिळालेलें व्याज रु. ६९९४० होतें. तोंच आंकडा सन १९५५ सालीं रु. ६५३८९ असा आहे. ठेवीवर दिलेलें व्याज सन १९५४ सालीं रु. २७०९७ होतें. तोंच आंकडा सन १९५५ सालीं रु. २९५५७ असा होता. बँकेच्या सर्वमान्य तत्त्वाप्रमाणें बँकेकडे येणाऱ्या ठेवी नाकारणें हें केव्हांहि योग्य नसतें. लोकांमध्यें बँकिंगची आवड उत्पन्न होऊन त्यांनीं आपल्या ठेवी बँकेंत ठेवणें व या ठेवींचा उपयोग देशाच्या विकासाच्या ज्या अनेक योजना आहेत त्याकडे त्यांचा उपयोग व्हावा असा देशांतील सर्व विचारवंतांचा व राज्यकर्त्यांचा आग्रह आहे. परंतु त्याचबरोबर संयुक्त भांडवली बँकांनीं, कर्ज व कॅशक्रेडिट्स यामध्यें सर्वसाधारणपणें कोणत्या धोरणानें आपल्या ठेवींची रक्कम गुंतवावी यावर रिझर्व्ह बँकेचें नियंत्रण आहे. याबाबत मी गेले वर्षीच्या माझ्या भाषणांत, रिझर्व्ह बँकेनें बँकांवर नियंत्रण करतांना लहान बँकांच्या व्यवहाराकडे पाहण्याचें स्वतंत्र असें धोरण ठेवणें इष्ट असल्याचें नमूद केलें होतें. मी माझें त्यावेळचे भाषणांत असेंहि नमूद केलें होतें कीं, "सहकारी बँकांप्रमाणेंच संयुक्त भांडवली बँकांची वाढ व जोपासना करणें जरूर आहे आणि या दृष्टीनें सरकार व रिझर्व्ह बँकेनें बँकांकडे पाहिलें पाहिजे."

मी आपल्या एका लहान बँकेचा अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणाची नोंद सरकारदरबारीं होणें जरी अडचणीचें असलें तरी सुद्धां मला एकप्रकारचें समाधान वाटतें कीं, आतां माझ्या विचारांशीं सहमत होणारे विचार बँकिंग-क्षेत्रांतील उच्च पदाधिकारी जनतेपुढें आपले विचार मांडूं लागले आहेत.

नुकतींच मुंबई येथें इंडियन बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष व केंद्रिय सरकारचे एका काळचे मंत्री श्री. सी. एच्. भाभा यांनीं असोसिएशनपुढें केलेल्या भाषणांत, देशांतील आर्थिक विकासाच्या योजनेंत बँकिंगचें स्थान व बँकांना येणाऱ्या अडचणी यासंबंधींचा उल्लेख केला आहे. त्यांनीं आपल्या भाषणांत मुख्यतः शेड्यूल्ड बँका व एक्सचेंज बँका यांच्यांतील चढाओढ आणि स्टेट बँक ऑफ इंडियास मिळणारे हक्क यासंबंधीं होणारी अडचण यांचा उल्लेख केला आहे. त्यांनीं आपल्या भाषणांत रिझर्व्ह बँकेनें या बाबतींत योग्य असें धोरण ठरविण्याची विनंती करून बँकां-बँकांमधील अप्रिय चढाओढ थांबविण्याची विनंती केली आहे. त्यांनीं पुढें असेंहि भाषणांत म्हटलें आहे कीं, बँकिंग कंपनीज ॲक्ट हा मुख्यतः कारभारांतील कार्यक्षमता वाढविण्यासाठी आहे. परंतु आज जी कांहीं जरूर आहे, तें म्हणजे निरनिराळ्या प्रकारच्या बँकांचें कार्यक्षेत्र व त्यांचें एकसूत्री धोरण ठरविणें जरूर आहे आणि रिझर्व्ह बँकेकडून सर्व प्रकारच्या बँकांना पितृवत् असें मार्गदर्शन व कांहीं सवलती देणें जरूर आहे.

वरील भाषणांतील सूत्ररूपाचा विचार मी माझ्या या पूर्वीच्या भाषणांत केलेला आहेच; मी अशी आशा करतों कीं, श्री. भाभा यांच्यासारख्या थोर व्यक्तीनें सुचविलेल्या विचारांचा सरकार व रिझर्व्ह बँक सहानुभूतीनें विचार करील.

आपणांस माहीत असेलच कीं, नवीन कंपनीज ॲक्ट हा पुढील महिन्याचे सुरवातीस अंमलांत येणार असून त्यामुळें संचालक मंडळींचेवर फार मोठी जबाबदारी येऊन पडत आहे. कंपनीज ॲक्टची अंमलबजावणी पुढें ढकलावी असा कांहीं प्रयत्न झाला; परंतु त्यांत यश येऊं शकलें नाहीं.

वास्तविक बँकिंग व्यवसायासाठी स्वतंत्र कायदा असतांना व बँकिंग व्यवहारावर रिझर्व्ह बँकेचें कडक नियंत्रण असतांना कंपनी कायद्यामधून बँकांना वगळणें हें योग्य झालें असतें. विशिष्ट व्यवसायांसाठीं एकच कायदा व एकच नियंत्रण करणारी शासनसंस्था ही व्यावहारिक व सुकर ठरते. परंतु ज्यावेळीं एका संस्थेस अनेक कायद्यांच्या नियंत्रणाखालून जावें लागतें त्यावेळीं कामापेक्षा कायद्याचीच कटकट जास्त होते. परंतु, हा विचार कायदे करणारांना कां पटूं नये हें समजत नाहीं.

मध्यवर्ती सरकारचे आर्थिक व खाजगी धंदे यांचें राष्ट्रीयिकरण करण्यासंबंधीं धोरण अद्याप अस्थिर आहे असें वाटतें. विमा कंपन्यांचें सरकारनें अचानकपणें ऑर्डिनन्स काढून राष्ट्रीयकरण केलें. इम्पीरीयल बँकेचें, स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें कायद्यानें रूपांतर केलें. यामुळें खाजगी भांडवल धंद्यांत गुंतविण्यास लोक नाखूष आहेत असें दिसतें.

एकीकडे सरकार खाजगी भांडवलवाल्यांना देशांतील विकासाच्या व पंचवार्षिक योजनेंत आपला वांटा उचलण्यास आव्हान करतात व दुसऱ्या बाजूनें अनेक कायदे करून त्यांच्या उत्साहास पायबंद घालतात. अशा परिस्थितींत खाजगी धंद्यांना आपला

कार्यक्रम व मर्यादा ठरविण्यास अडचणी पडत आहेत. सर्वसामान्य जनता या आर्थिक मदत मिळण्यापासून दूर चालली असून त्यामुळें त्यांची बुद्धि, कर्तव्य, मर्यादा यांस आळा बसत चालला आहे असें माझ्या अल्प मतीस वाटतें. अशा स्वरूपाचेंच धोरण सरकारनें कायम ठेवलें तर लहान लहान बँका व उद्योगधंद्यांची यापुढें तरी धडगत राहणार नाहीं व जनतेच्या दैनंदिन व्यवहारांत अनेक कष्टमय अडचणी निर्माण झालेशिवाय रहाणार नाहींत व गव्हाबरोबर हे किडेहि रगडले जाणार असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें.

आपल्या बँकेच्या एकंदर ताळेबंदावरून आपणांस असें दिसून येईल कीं, आपल्या संचालक मंडळानें कर्ज व कॅशक्रेडिट देतांना अत्यंत काळजीपूर्वक धोरण अवलंबिलें व त्यामुळें तारणी व बिनतारणी कर्जाचें प्रमाण शक्य तितके आटोक्यांत आणण्याचा प्रयत्न केला.

सन १९५४ सालीं एकूण दिलेलीं कर्जें व कॅशक्रेडिट रु. ६१२००० होतीं तोच आंकडा चालू सालीं रु. ५०५००० सुमारास आहे. वरील आंकड्यांची आणखी छाननी करतांना आपणांस असें दिसून येईल कीं, १९५४ सालीं तारणी कर्जें व कॅशक्रेडिटस रु. ३६८००० होतीं तीं चालू सालीं रु. ३८९००० आहे. बिनतारणी कर्जें व कॅशक्रेडिट यांचा आंकडा अनुक्रमें रु. १९८००० व रु. १६९००० आहे. जुनीं कर्जें व कॅशक्रेडिटस वसुलीबाबत बँकेच्या संचालक मंडळानें व अधिकाऱ्यांनीं नेटानें प्रयत्न करून व कुळांना नवीन नवीन कायद्यामुळें मिळत असलेलें संरक्षण वगैरेसारखे अनेक प्रकारचा त्रास सोसून येणें रक्कम वसूल करीत आहेत हें नमूद करण्यास मला आनंद वाटत आहे.

मागील वर्षाचे माझे भाषणांत नमूद केलेप्रमाणें आपल्या बँकेच्या भोर येथील इमारतीचें काम पूर्ण झालें असून बँकेनें तेथें आपली कचेरी विजया दशमीचे सुमुहूर्तावर नेली आहे. इमारतीसाठी काटकसरीनें शक्य तेवढा खर्च केला असून त्यांत सेफडिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीची व्यवस्था व गोडाऊनचीहि व्यवस्था केली आहे. या इमारतीमुळें बँकेच्या स्थैर्यांत तसेंच भोर येथील सौंदर्यांत भर पडली आहे हें म्हणणें अतिशयोक्तीचें होईल असें वाटत नाहीं.

माझें भाषण संपवण्यापूर्वीं मला माझ्या कामांत बँकेचे संचालक मंडळावरील माझे सहकारी, शाखा समितीचें अध्यक्ष, व नोकरवर्ग व भागीदार आणि खातेदार, सरकारी अधिकारी यांचें बहुमोल साह्य व मार्गदर्शन झालें आहे. त्याचप्रमाणें श्री. वाय. डी. खोले यांची राहुरी सहकारी साखर कारखान्यांत मॅनेजर व सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाली आहे. श्री. य. द. खोले यांनीं १९४९ सालीं संचालक मंडळावर आल्यापासून बँकेचे दैनंदिन व्यवहारांत तनमनधन अर्पण करून जी बहुमोल मदत केली त्याबद्दल संचालक मंडळ त्यांचें ऋणी आहे. रावसाहेब पुणें सोडून जात असल्यामुळें दैनंदिन व्यवहारांत आपला सल्ला देऊं शकणार नाहींत त्यामुळें बँकेचें अपरिमित नुकसान होणार आहे. परंतु श्री. खोले यांनीं संचालक म्हणून राहण्याचें कबूल केल्यामुळें त्यांच्या अनुभवाचा फायदा बँकेस मिळत राहील. याबद्दल मी कृतज्ञतापूर्वक येथें उल्लेख करतों व मी आपणांस अशी विनंती करतों कीं, आपणांपुढें मांडलेला वार्षिक अहवाल व ताळेबंद एकमतानें मान्य करावा.

## ब्रिटनच्या आर्थिक परिस्थितीचें चित्र

इंटर नॅशनल मॉनेटरी फंडाचे अध्यक्ष श्री. इव्हार रूथ ह्यांनीं फंडातर्फे करण्यांत येत असलेल्या कार्याबद्दलचा वार्षिक अहवाल संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक व सामाजिक समितीला सादर केला आहे. ह्या अहवालांत ब्रिटनच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं त्यांनीं कांहीं विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात कीं, ब्रिटनच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा होण्यास थोडा पायबंद बसला आहे हें खरें; पण ही वस्तुस्थिति तात्कालिक स्वरूपाची आहे. ब्रिटनच्या सरकारनें हुंडणावळीवरील निर्बंध अगर त्यासारखीं इतर प्रत्यक्ष नियंत्रणें ह्यांचा अवलंब केलेला नाहीं, हा त्याचाच उत्तम पुरावा आहे. १९५५ सालीं ब्रिटनला निर्यात व्यापारांत आपल्या प्रतिस्पर्ध्यांशीं टक्कर देतां आली नाहीं ही गोष्ट खरी आहे; तथापि त्याचीं कारणें विविध प्रकारचीं आहेत. पौंडाच्या कक्षेबाहेरील देशांचा पौंडांतल्या गटांतील राष्ट्रांशीं जो व्यापार होतो, त्यांतील अनुकूल तफावतींत घट झाल्याचेंहि कारण त्या कारणांत आहे. राष्ट्रां–राष्ट्रांमधील व्यापारांत देणींघेणीं करणें अधिक सुलभ झालें आहे. कारण, युद्धांत झालेल्या नुकसानीमुळें राष्ट्रांना आपलीं व्यापारी देणीं देणें जें जड जात होतें तसें आतां जात नाहीं. अमेरिकेकडून लष्करी स्वरूपाची व आर्थिक, अशी दोन्ही प्रकारची मदत दिली जात आहे. त्यामुळें बऱ्याच देशांना त्यांना होणाऱ्या डॉलर्सच्या प्राप्तीपेक्षां कमी खर्च करतां येणें शक्य झालें आहे. त्यामुळें त्यांच्या डॉलर्सच्या गंगाजळींत भर पडूं लागली आहे. १९५० सालापासून आंतरराष्ट्रीय व्यापारांत हुंडणावळीवरील निर्बंधाच्या ऐवजीं इतर द्रव्यविषयक उपायांचा अवलंब करून देणींघेणीं जुळती करतां येणें शक्य होऊं लागलें आहे. १९५५ सालीं जगाच्या व्यापार–व्यवहारांत डॉलर्स अधिक सुलभतेनें मिळूं लागले. त्यामुळें डॉलरच्या कक्षेबाहेरील जगाचा डॉलर्सच्या कक्षेंतील देशांशीं होणारे व्यवहार अधिक सौकर्यानें करतां येऊं लागले आहेत. युद्धानंतर अशी परिस्थिति प्रथमच लाभली आहे.

---

## दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि.

वरील कंपनीनें १९५५ सालीं त्यापूर्वीच्या वर्षाच्यापेक्षा १ लक्ष, १८ हजार रु. जास्त किंमतीची विक्री केली आणि हिशेबांत २४,०४२ रु. तोटा राहिला. १९५४ मध्यें तोटयाची रक्कम ९९,५०५ रु. होती. नफा–तोटा खातीं १९५४ अखेर २,०६,०५० रु. तोटा होता, त्यांत २४,०४२ रु. ची आतां भर पडली. जनरल रिझर्व्हचे १,१०,००० रु. व डिव्हिडंड ईक्वलायझेशन रिझर्व्हचे ४०,००० रु. असे १,५०,००० रु. कमी करून आतां नफातोटा खातीं ८०,०९२ रु. तोटा दिसत आहे. उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. एक ऑटोमॅटिक बाटली करण्याचें यंत्र सुरू झालें आहे आणि दुसरेंहि लवकरच सुरू होईल अशी अपेक्षा आहे. दोन्ही यंत्रांच्या उत्पादनानंतर पुढील काळ चांगला जाईल असा विश्वास आहे.

---

**आंध्र राज्याची राजधानी**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आंध्र राज्याची राजधानी जी कुर्नूल, तिचा विकास करण्यासाठीं २८३ लाख रुपये खर्च करण्यांत येण्याचा संभव आहे. मात्र राज्याची राजधानी म्हणून हैदराबाद शहराची निवड करण्यांत आल्यास राजधानीसाठीं एवढा मोठा खर्च करण्याची जरूर भासणार नाहीं.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.